# सौंदर्यविश्वातील गुणी व्यक्तीमत्त्व



अलका पवार

एखादी गोष्ट उकलून घ्यायची म्हटले की तिचा प्राण उडून जातो. म्हणूनच सौंदर्यशास्त्राच्या पुस्तकात तुम्हाला सौंदर्य आढळणार नाही. ते पुस्तक अभ्यासकासाठी असते. या लेखात सौंदर्याची तात्विक चर्चा नाही. सौंदर्य चेतनेपेक्षा श्रेष्ठ नाही. ते आयुष्यासाठी मूल्य होऊ शकत नाही. आयुष्य हेच खुद्द एक मूल्य आहे. हा संदेश स्वतःच्या सौंदर्याविषयी विचार करणाऱ्या महिलांच्या मनावर रुजविताना आणि स्वतःही वर्षानुवर्ष त्याच विचारांनी चालणाऱ्या कळव्याच्या प्रियांका ब्युटी पार्लरच्या संचालिका अलका पवार यांचा हा परिचय...

मूळच्या कोल्हापूरच्या असलेल्या अलकाताईंना सौंदर्यशास्त्राचे बाळकडू मिळाले ते त्यांच्या वडिलांकडून. अवघ्या १६ वर्षांच्या असताना कोल्हापूरमधील पहिले ब्युटी पार्लर चालवण्याचा धाडसी निर्णय घेताना त्यांना सुरुवातीला समाजाकडून प्रतारणाही सहन करावी लागली. स्वभावाने अत्यंत विनम्र असणाऱ्या अलकाताई ठामपणे आपली मते मांडतात. तेव्हा त्यांच्या सुंदर व्यक्तिमत्वाचा पारदर्शीपणा जाणवतो. आपल्या जुन्या आठवणी सांगताना त्या म्हणतात, आपली मुलगी ६ महिन्यांची असताना त्यांनी प्रियांका ब्युटी पार्लरची निर्मिती केली. आज या पार्लरने २९ वर्ष पूर्ण केली असून ठाणे, भिवंडी, कल्याण, डोंबिवली व पुण्यावरून महिला स्वतःला सुंदर करून घेण्यासाठी येतात. मग त्यामध्येच नुकताच तारुण्यामध्ये प्रवेश केलेल्या १६ वर्षांच्या तरुणीपासून ते नातवंडांना खेळवणाऱ्या आजीबाईंचा समावेश आहे.

सुप्रसिद्ध ब्युटीशियन माया परांजपे यांच्याकडे अलकाताईंनी ब्युटीशियनचे प्रशिक्षण घेतले असून सतत नवनवीन गोष्टी शिकण्याचा त्यांचा प्रयास असतो. शिवाय एखादा ग्राहकाची त्वचा, डोळे किंवा केस याबाबतीत काही समस्या असल्यास त्या उपचारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरकडे जाण्याचा सल्ला देतात. ब्युटीशियन होण्यासाठी माणसाची आवड, उत्तम प्रकृती, बोलघेवडा स्वभाव, आनंदी वृत्ती, कुशल हस्तकौशल्य आत्मविश्वासपूर्ण वागणूक, व्यवहारचातुर्य, मन वळविण्यासाठी विलक्षण हातोडी, सभ्य वागणूक आणि महत्त्वाचे म्हणजे शांत स्वभाव अशा प्रकारचे व्यक्तीमत्त्व असण्याची आवश्यकता असते. अनेक प्रकारच्या विविध स्वभावांच्या ग्राहकांशी व्यवहार करताना आपल्या कौशल्यामुळे त्यांचे पूर्ण समाधान होऊ शकेल, असे प्रयत्न करायला हवेत. कारण संतुष्ट ग्राहकांकरवीच या व्यवसायाची यशस्वी जाहिरात होऊ शकते आणि मगच आपला या क्षेत्रात व्यवस्थित जम बसू शकतो, असे मत अलकाताई मांडतात.

अलकाताईंच्या पार्लरमध्ये आयब्रोपासून, विविध प्रकारच्या केशरचना, ब्लीच, अरोमाथेरपी, पिलिंग थेरपी, ४ डी मेकअप, इतरपर्यंतची कामे केली जातात. गेल्या २९ वर्षांपासून या क्षेत्रामध्ये ९९ टक्के चांगलेच अनुभव आल्याचे अलकाताई सांगतात. अलकाताईंकडे ब्युटीशियन प्रशिक्षणार्थी पाच मुली आहेत. तसेच त्यांच्या काही विद्यार्थिनी परदेशात स्थायिक होऊन ब्युटीशियन क्षेत्रात प्राविण्य मिळवत आहे. अत्यंत कमी कालावधी आणि जेमतेम खर्चात हे तंत्र अवगत करून घेऊन स्वतंत्र व्यवसाय नावारूपाला आला की ग्राहक कायमचे बांधले जातात. आकर्षक व्यक्तिमत्त्व ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने पाहता सौंदर्यातज्ज्ञाची सेवा खर्चिक असते. आपल्या पार्लरमध्ये येणाऱ्या प्रत्येक स्त्रीला सुंदर करण्याचा अट्टाहास अलकाताईंना आहेच. त्याबरोबर नवी मुबईतील पनवेल येथे त्या आपली नवी शाखा लवकरच उघडणार आहेत. त्यांच्या सौंदर्याविश्वातील हा व्यवसाय भविष्यात वृद्धींगत होवो ही इच्छा...